# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी

जा.क्र.-प्रवेश/२०२२/प्र.क्र.०१/विद्या-१०(ब)
दिनांक :०६/०६/२०२२

## दरपत्रक आमंत्रण सुचना

कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या कार्यालयास निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखांतर्गत कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठस्तरीय केंद्रीय प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविणे आहे. संबंधीत ईच्छूक नोंदणीकृत संस्था/व्यावसायिक यांनी अटी व शर्तीची पुर्तता करुन आपले दरपत्रक सर्व करांसहीत बंद लिफाप्यात दि. १३.०६.२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचतील या बेताने पाठवावेत.

| अ.क्र | विवरण | दर (सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| १ | निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखांतर्गत कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता राबविणेबाबत.<br>(प्रवेश प्रक्रिया विषयीचे सर्व करांसहीत प्रति विद्यार्थी/प्रति अर्ज दर आकारणी) | |

**अटी व शर्तीः**

१. दर पत्रक बंद लिफाप्यात दिनांक १३.०६.२०२२ पर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया विषयीचे सर्व करासहीत प्रति विद्यार्थी प्रवेश अर्ज या नुसार कुलसचिव, वनामकृवि, परभणी या नावे या कार्यालयास पाठवावे.
२. उशीराने प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
३. दरपत्रकासोबत जीएसटी क्र, पॅन कार्ड, नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक राहील.
४. प्राप्त दरपत्रके उपकुलसचिव (विद्या) यांचे दालनात दि. १४.०६.२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. उघडण्यात येतील.
५. कुठलेही कारण न दर्शविता दर पत्रक स्विकारणे, रद्द करणे बाबतचा अधिकार समितीने राखून ठेवला आहे.
६. दरपत्रके पाठविताना पाकीटवर 'कृषि तंत्र पदविका ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दरपत्रक' असा स्पष्ट उल्लेख करावा.
७. आपले दरपत्रक मंजुर झाल्यास रु. १००/- स्टँप पेपर वर सामंजस्य करार (MOU) करण्यात येईल.
८. प्रवेश फॉर्म साठी राखीव संवर्ग विद्यार्थ्यांकडून रु. २००/- व खुल्या संवर्गाच्या विद्यार्थ्यांकडुन रु. ४००/- प्रमाणे फी आकारण्यात येईल. सदर फी ही या कार्यालयाकडून कळविलेल्या उपकुलसचिव (विद्या) वनामकृवि, परभणी याच खात्यावर ऑनलाईन पध्दतीने जमा झाली पाहिजे जमा झालेल्या रक्कमेचा तपशिल आपल्या कडुन वेळोवेळी या कार्यालयाकडे सादर करावा लागेल.
९. विहीत मुदतीत जर अपेक्षित प्रवेश अर्ज प्राप्त झाले नाहीत तर अर्ज स्विकृतीची मुदत २ किंवा ३ वेळेस वाढविण्यात येईल. किंवा प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतरही मोठया प्रमाणात जागा रिक्त राहील्यास विशेष प्रवेश प्रक्रियेसाठी पुनःश्च अर्ज मागविण्यात येतील.
१०. प्रवेश प्रक्रिया ही या कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या आरक्षण तक्त्यानुसार करावी लागेल. या मध्ये कसल्याही प्रकारची तक्रार येता कामा नाही. जर तक्रार आल्यास सर्वस्वी आपण जबाबदार असाल.
११. प्रवेश प्रक्रिया ही या कार्यालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार करावी लागेल.
१२. प्रवेश प्रक्रियेची वेबसाईट अंतिम मुदतीपर्यंत निरंतर सुरु पाहिजे त्याबाबत विद्यार्थ्यांकडून तक्रार येता कामा नये.
१३. काम समाधानकारक झाल्यानंतरच देयक अदा केले जाईल. देयक दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावे.
१४. सर्व अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवलेले आहेत.

06/06/22

(धिरजकुमार रा. कदम)
**कुलसचिव**

प्रतः

१. कुलसचिव कार्यालय सुचना फलक
२. नियंत्रक कार्यालय, सुचना फलक
३. विद्यापीठ संकेत स्थळ